बीड (महाराष्ट्र) | वर्ष ३ रे | अंक २९६ | शुक्रवार, दि. २६ जानेवारी २०२४ | RNI-MAHMAR/2021/80074 * Post: Reg.No L/164/RNP/Beed 2022-24 | पान १ | पाने ४ | किंमत ३ रूपये
Beed (Maharashtra) | Year 3 | Issue 296 | Friday 26 January 2024 | RNI-MAHMAR/2021/80074 * Post: Reg.No L/164/RNP/Beed 2022-24 | Page 1 | Pages 4 | Price 3

प्रजासत्ताक दिन चिरायु होवो...

मराठवाडा पत्र

बीड datta.namale@gmail.com | dailymarathwadapatra2021@gmail.com | epaper : https://marathwadapatra.com | Eportal-https://marathwadapatra.com | Mo. 9822152955

मनोज जरांगे पाटील यांच्या आझाद मैदानातील उपोषणाला पोलिसांनी परवानगी नाकारली

मनोज जरांगे पाटील आपल्या आझाद मैदानातील मुक्कामावर ठाम

मराठा आरक्षणासाठी सरकारशी दोनहात करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्या आझाद मैदानावरील उपोषणाला मुंबई पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. आझाद मैदान पोलिसांनी या प्रकरणी जरांगेना उपोषणासाठी आझाद मैदान अपुरे असल्याचे नमूद करत त्यांना नवी मुंबईतील खारघर येथील सेक्टर २९ मधील इंटरनॅशनल कॉर्पोरेशन पार्क मैदानात उपोषणाला बसण्याची सूचना केली आहे. पण त्यानंतरही जरांगे आपल्या आझाद मैदानातील मुक्कामावर ठाम असून, त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना आपल्या गाड्यांची तोंडे मुंबईच्या दिशेने वळवण्याचे आदेश दिलेत. लाखोंच्या संख्येने मोर्चेकरी वाहनांसह मुंबईत येणार आहेत. त्यामुळे मुंबईत दैनंदिन जनजीनव विस्कळीत होऊन कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्याच पार्श्वभूमीवर आझाद मैदानावर मनोज जरांगे-पाटील यांना आंदोलन करण्यास पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. नवी मुंबईमधील खारगर येथील सेंट्रल पार्कमधील आंतरराष्ट्रीय मैदानाचा पर्याय पोलिसांनी आयोजकांना सुचवला आहे.

“जेवढे मुंबईचे हाल होणार, तेवढे आमचेही होत आहेत”

“आझाद मैदानावर व्यासपीठ उभे राहिलं आहे,” अशी प्रतिक्रिया मनोज जरांगे-पाटील यांनी दिली आहे. “मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी कुठलाही संवाद झाला नाही. आम्हाला तोडगा काढायचा आहे. मज्ञा करण्यासाठी मुंबईला आलो नाही. जेवढे मुंबईचे हाल होणार आहेत, तेवढं आमचेही हाल होत आहेत. दोघांचेही हाल होऊ द्यायचे नाही, हे सरकारच्या हातात आहे,” असं जरांगे-पाटलांनी म्हटलं.

शिरूर कासार पंचायत समितीच्या इमारतीचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते लोकार्पण

उत्कृष्ट व दर्जेदार विकासकामे करणे ही सर्वांचीच जबाबदारी - धनंजय मुंडे

बीड जिल्ह्यातील शिरूर कासार येथील पंचायत समितीच्या उभारण्यात आलेल्या नवीन इमारतीचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी उत्कृष्ट व दर्जेदार विकासकामे करणे ही सर्वांचीच जबाबदारी असून या प्रशासकीय इमारतींमध्ये आपली कामे घेऊन येणाऱ्या नागरिकांना या वास्तू आपल्या वाटाव्यात, असे काम करावे, अशी अपेक्षा धनंजय मुंडे यांनी बोलताना व्यक्त केली. यावेळी शिरूर कासार तालुक्यातील ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींचे वसतिगृह, कृषी कार्यालय यांसह अन्य शासकीय इमारती (५६ कोटी ६६ लाख), विविध रस्त्यांची कामे (२२ कोटी ५० लाख) अशा सुमारे ७९ कोटी रुपयांच्या विकासकामांचा भूमिपूजन करून शुभारंभ करण्यात आला. ▶▶ पान २ वर

शेतकऱ्याने घेतला गळफास

गेवराई, (प्रतिनिधी):- पावसा अभावी, नापीक शेती व मराठा आरक्षण मिळत नसल्याने आपल्या मुलाने भावी जीवन कसे जगावे याच्या विचाराने शेषकरी मोहन उद्धव थोपटे राहणार अर्धामसाला ता.गेवराई (वय ४३) यांनी दि.२० जानेवारी रोजी सकाळी स्वतः च्या शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली.त्यांच्या पश्चात परिवारामध्ये पत्नी,मुलगा, ▶▶ पान २ वर

पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम

बीड (प्रतिनिधी):- भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७५ वा वर्धापन दिनानिमित्त शुक्रवार दि. २६ जानेवारी २०२४ रोजी प्रजासत्ताक दिन सोहळ्यानिमित्त मुख्य शासकीय समारंभ पोलिस मुख्यालय मैदानावर कृषी मंत्री तथा बीड जिल्हयाचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते सकाळी ९ वाजून १५ मिनिटानी ध्वजारोहण कार्यक्रम होणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ८ वाजून १५ मिनिटांनी जिल्हाधिकारी दिपा मूधोळ-मुंडे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ होणार आहे. तसेच मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील ध्वजारोहणाचा कार्यक्रम अपर जिल्हाधिकारी त्रिगुण कुलकर्णी यांच्या हस्ते सकाळी ७.४५ वाजता संपन्न होणार आहे. दोन्ही ध्वजारोहण समारंभ संपल्यानंतर अधिकारी व कर्मचारी यांनी जिल्हा पोलीस मुख्यालय मैदान बीड येथील ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय समारंभास सकाळी ८.३० वाजेपूर्वी शासकीय गणवेषात उपस्थित रहावे, असे आवाहन, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे. यासह जिल्हयात विविध ठिकाणी ध्वजारोहण केले जाणार असून अपर जिल्हाधिकारी कार्यालय अंबाजोगाई येथील ध्जारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ अपर जिल्हाधिकारी यांच्या हस्ते सकाळी ९.१५ वाजता तसेच सर्व तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी मुख्य ध्वजारोहणाचा कार्यक्रम सकाळी ९.१५ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

माहिला आणि नवमतदारांची संख्या वाढविण्यासाठीचे प्रयत्न व्हावे : जिल्हाधिकारी

बीड (प्रतिनिधी): बीड जिल्हयातील महिला आणि नवमतदारांची संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न व्हाखेत, अशी अपेक्षा जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी आज मतदार दिनाच्या कार्यक्रमाला व्यक्त केली.

बीड जिल्हा प्रशासनाच्यावतीने आज जिल्हा नियोजन सभागृहात 'राष्ट्रीय मतदार दिवस' साजरा करण्यात आला. त्यावेळी जिल्हाधिकारी बोलत होत्या. या कार्यक्रमाप्रसंगी अप्पर जिल्हाधिकारी डॉ. त्रीगुण कुलकर्णी , निवासी उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी शैलेश सुर्यवंशी, कविता जाधव, संगीता घागरे, तहसीलदार ओंमकार देशमुख, सुहास हजारे, नरेंद्र कुलकर्णी मंचावर उपस्थित होते. जिल्हाधिकारी पुढे म्हणाल्या, बीड जिल्हयात लोकसंख्या जनगणनेनुसार महिलांची संख्या अधिक आहे. मात्र, मतदार यादीत ती कमी दिसुन आली. तसेच १८ ते १९ वयोगटातील मतदारांची संख्याही पाहीजे तेवढी दिसून आली नाही. विद्यार्थी गटात मोडले जाणारे नवमतदार हे अभ्यासासाठी किंवा पुढील शिक्षणासाठी महानगरात जाण्याची शक्यता असल्याने त्यांच्या पालकास पटवून त्यांची नावे यादीत समाविष्ट करावीत. यासह जिल्हयातील मयत व्यक्तींचे नावे मतदार यादीतून वगळण्याचा कटाक्षाने प्रयत्न करावा, असेही जिल्हाधिकारी यावेळी म्हणाल्या.

दरवर्षी २५ जानेवारी हा दिवस 'राष्ट्रीय मतदान दिवस' म्हणुन साजरा केला जातो. मतदानाच्या दिवशी मतदारांनी मतदानाचा हक्क बजावुन या देशाचे विधाता बनण्याची संधी या निमित्ताने आपल्याला लोकशाहीने दिली असल्याचे ▶▶ पान २ वर

लाचखोर उपजिल्हाधिकारी पोलिसांच्या ताब्यात

बीड (प्रतिनिधी):- तलावात गेलेल्या जमिनीचा मावेजा मिळावा यासाठी दहा हजार रुपयांची लाच मागून पाच हजार रुपये घेताना बीडच्या उपजिल्हाधिकारी भारती सागरे यांना रंगेहाथ पकडण्यात आले.निवृत्त मंडळ अधिकारी सरवदे यांना देखील ताब्यात घेण्यात आले आहे. सलग दुसऱ्या दिवशी महसूल विभागाच्या लाचखोरीचे कारवाई झाल्याने खळबळ उडाली आहे.

बीड तालुक्यातील सावरपोत्रा येथील तलावाच्या बुडीत क्षेत्रात गेलेल्या घराचा पाच लाख रुपयांचा मावेजा कार्यालयात जमा झाला होता.हा मावेजा मिळावा यासाठी तक्रारदार अनेकवेळा उपजिल्हाधिकारी भारती सागरे यांना भेटला.प्रत्येकवेळी वेगवेगळी कारणे सांगून मावेजा देण्यात टाळाटाळ करण्यात आली. दरम्यान याच कार्यालयात काम करणारा खाजगी इसम नवनाथ सरवदे जो सेवानिवृत्त मंडळ अधिकारी आहे त्याची भेट घेण्यास उपजिल्हाधिकारी यांनी सांगितले. सरवदे यांनी मावेजा हवा असल्यास दहा हजार रुपयांची मागणी केली.

जोगाईवाडी ग्रामस्थांनी ग्रामपंचायतला ठोकले कुलूप

अंबाजोगाई (प्रतिनिधी)- अंबाजोगाई शहरा लगत असणाऱ्या जोगाईवाडी ग्रामपंचायतचा समावेश अंबाजोगाई नगर परिषदेत ग्रामपंचायतने करू नये या मागणीसाठी ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप लावून मागणी मान्य होईपर्यंत आम्ही कुलूप उघडणार नाही असा आक्रमक पवित्रा ग्रामस्थांनी घेतला आहेत्ङ्क जोगाईवाडी येथील मोरेश्वर महादेव जाधव माजी सैनिकाचे नेतृत्वाखाली गावातील साडेतीनशे ग्रामस्थांनी निवेदनाव सह्या करून सरपंच सह बीडीओना लेखी निवेदन दिले आहे जोगाईवाडी ग्रामपंचायतचा अंबाजोगाई नगरपरिषदेत समावेश करण्यासाठी सरपंच व काही सदस्य प्रयत्न करत असल्याची कूण कूण गावकऱ्यांना लागताच ग्रामस्थातून सदरील प्रक्रियेला विरोध करण्याचा निर्णय घेण्यात आला येत्या २६ जानेवारी पर्यंत लेखी ठराव व आश्वासन ▶▶ पान २ वर

मेन वीजवाहक तार अंगावर पडून शेतमजुराचा होरपळून मृत्यू

गावकऱ्यांचा वीज कंपनी विरोधात आक्रोश;गुन्हा दाखल करण्याची मागणी

माजलगाव (प्रतिनिधी):- तालुक्यातील लोनगाव येथीलबस्टेशनला गेलेली मेन वीज वाहक तार अंगावर पडल्याने जाग्यावरच होरपळून शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवार दि. २५ रोजी पहाटे निपाणी टाकळी येथे घडली.दरम्यान सदरील घटनेस येथील वीज कंपनी जबाबदार असल्याचा आक्रोश करत गावकऱ्यांनी संबंधित बेजबाबदार अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.ङ्कङ्कयाबाबत अधिक माहिती अशी की, माजलगाव तालुक्यातील लोनगाव येथे महावितरण कंपनीचे सबस्टेशन आहे.या सबस्टेशन करिता(मेन लाईन)वीज वाहक तर ही निपाणी टाकळी येथून गेलेली आहे.निपाणी टाकळी गावातील रहिवाशी बालासाहेब वैजनाथ पांडे (वय ६५ वर्षे) हे शिवराम धोंडिबा वाघमारे यांच्या शेतात शेतमजुरीचे काम करत होते.दरम्यान शेतातून दैनंदिन काम आटोपून आज दि.२५ गुरुवारी पहाटे घराकडे येत होते.या दरम्यान गावच्या स्मशानभूमी जवळ आले असता सबस्टेशन गेलेली मुख्य वीज वाहक तर त्यांच्या अंगावर पडली,त्यातच त्यांचा होरपळून मृत्यु झाला. दरम्यान या दुर्दैवी घटनेस तालुक्यातील वीज वितरण कंपनीचा ढिसाळ कारभार जबाबदार असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे.वीज वितरण कंपनीच्या अनेक तारी या जीर्ण झाल्या आहेत.त्यामुळे याअगोदरही पशुधनांचे बळी अशा दुर्दैवी घटनातुन गेले आहेत.त्यामुळे जीर्ण तारा बदलण्याची मागणी अनेक वेळेस गावकऱ्यांनी वीज वितरण कार्यालयाला केली होती. परंतु कंपनीने या मागणीला केराची टोपली दाखवली.असा आरोप गावकरी करत

आहेत.दरम्यान सदरील शेतमजुराच्या दुर्दैवी ङ्कहोरपळून झालेल्या मृत्यू वितरण कंपनी जबाबदार असल्याचा आरोप करत गावकऱ्यानी ग्रामीण पोलीस स्टेशन समोर संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

संपादकीय

शेतकऱ्यांसाठी वरदान

जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प राज्याच्या निवडक जिल्ह्यांमध्ये हवामान–अनुकूल शेती आणि अल्पभूधारक शेतकरी यांची शेती किफायतशीर करण्यासाठी राबविण्यात येते आहे. ह्या प्रकल्पात राज्यातील अकोला, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, हिंगोली, लातूर, धाराशिव, परभणी, वर्धा, वाशीम, यवतमाळ, बुलडाणा, जळगाव, जालना व नाशिक या १६ जिल्ह्यांमधील ५२२० अवर्षणप्रवण गावांचा समावेश असून यामध्ये पूर्णा नदीच्या खोऱ्यातील ९३२ खारपाण गावांचा समावेश आहे. या प्रकल्पाची मंजूर किंमत रु. ४००० कोटी होती. मात्र प्रकल्पाची यशस्विता व थेट लाभ हस्तांतरण प्रणालीवर प्राप्त झालेल्या दायित्वाच्या अनुषंगाने रु. ५४६९ कोटींच्या सुधारित प्रकल्प खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या यशस्वितेमुळे प्रकल्पामध्ये सद्य:स्थितीत समाविष्ट असलेल्या १६ जिल्ह्यांसह विदर्भातील उर्वरित नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली अशा एकूण २१ जिल्ह्यांमध्ये रु. ६००० कोटी किंमतीचा प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबविण्यास शासनाने तत्वत: मान्यता दिली असून गाव निवड समितीच्या बैठकीत प्राप्त निर्देशांनुसार हवामानास अधिक संवेदनशील गावसमूह व त्यामधील गावे यांची निवड करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

प्रकल्प अंमलबजावणीसाठी सर्वसमावेशक व गरजांवर आधारित कार्यपद्धती गाव हा घटक मानून प्रकल्पाचे लोकसहभागीय नियोजन करणे. ग्रामपंचायतीच्या उपसमितीकडे (ग्राम कृषी संजीवनी समिती) निर्णय प्रक्रिया, प्रकल्प समितीमध्ये ग्रामपंचायत कायद्यानुसार सर्व घटकांना पुरेसे प्रतिनिधित्व – महिला ५० टक्के, कृषी विभागाच्या तांत्रिक सहकार्याने प्रकल्प समिती गावचा विकास आराखडा तयार करते. प्रकल्पाच्या सहाय्याने बदलत्या हवामानात शेतीसाठी करावयाच्या गुंतवणुकीचा आराखडा पाण्याचा ताळेबंद, शेतीसाठी पाणी, जमिनीचे आरोग्य व्यवस्थापन, पिकांसाठी नवीन तंत्रज्ञान, कृषी व्यवसाय आणि शेतकऱ्यांची क्षमता बांधणी या बाबींवर भर. मागणी नुसार लाभ या तत्वावर अंमलबजावणी. महिला शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रत्येक प्रकल्प गावात कृषिताईचे नामनिर्देशन. ऑनलाईन व कागदविरहित () प्रणालीचा वापर.

प्रकल्पाची वित्तीय स्थिती जागतिक बँकेच्या करारानुसार मूळ प्रकल्पाची किंमत रु. ४ हजार कोटी असून राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार सुधारित प्रकल्प किंमत रु. ५हजार ४६९ कोटी इतकी आहे. शासनाकडून आजअखेर रु. ४ हजार ८७०.५८ कोटी प्राप्त झाला असून आज अखेर रु. ४ हजार ६७८ कोटी खर्च करण्यात आला आहे. जागतिक बँककडून ७० टक्के हिश्श्याप्रमाणे रु. २७५७.४९ कोटी (३५६.४३ दशलक्ष डॉलर) इतका परताव प्राप्त. जागतिक बँककडून उचलेल्या कर्जाची परतफेड करावयाचा कालावधी मे, २०२४ पासून १५ वर्षांचा आहे. प्रकल्पातून दिलेले लाभ प्रकल्प गावातील ४ लाख ८५ हजार ३६० वैयक्तिक शेतकऱ्यांच्या ६ लाख ९६ हजार ०९७ अर्जांपोटी रु. ३ हजार ८१६ कोटी रुपये अनुदान वर्ग. प्रकल्प जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्या व गटांच्या ४ हजार ७०२ कृषी व्यवसाय प्रस्तावांना ५०२ कोटी रुपये अर्थसहाय्य. मृद व जलसंधारणाच्या ३ हजार ५९२ कामांवर ८१ कोटी रुपये निधी खर्च केला.

बदलत्या हवामानाशी शेतकऱ्यांना दिलेले तंत्र : शेतीशाळा अंतर्गत बीबीएफ तंत्राचा अवलंब, तिळाची अर्काचा वापर, कापूस पिकाकरिता 'एक गाव एक वाण', जैविक खताची बिज प्रक्रिया, फळ पीक लागवडीचे वेळी मुळाच्या परिघात सिंचन पद्धतीचा अवलंब या हवामान अनुकूल तंत्रज्ञानावर भर.

शून्य मशागत व रुंद वाफा व सरी (बीबीएफ) तंत्रज्ञान अवलंबण्यास प्रोत्साहन : बदलत्या हवामानामध्ये जमिनीची सुपीकता टिकविण्यासाठी व जमिनीतील कर्ब ग्रहण वाढविण्यासाठी शेतकऱ्यांनी संवर्धित शेती पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक म्हणून ''शून्य मशागत'' व ''बीबीएफ'' या तंत्रज्ञानाचा वापर अत्यंत प्रभावीपणे करण्यात येत आहे.

प्रकल्पाची डिजिटल अंमलबजावणी : प्रकल्पाचे लाभ, सूक्ष्मनियोजन, शेतीशाळा , मनुष्यबळ व्यवस्थापन, कृषी हवामान सल्ला–सेवा संकेतस्थळ, फार्मर ॲप द्वारे शेतकऱ्यांना कृषी–हवामान सल्ला, हवामान अनुकूल तंत्रज्ञान, बाजारभाव, गोदाम उपलब्धता विषयक माहिती मोबाईल ॲप द्वारे उपलब्ध करून दिलेली आहे.

तुलसी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना मिळाला मोठे पॅकेज मिळवण्याचा करियर मंत्र

बीड(प्रतिनिधी):– कॅम्पस प्लेसमेंट मधून विद्यार्थ्यांनी मोठे पॅकेज कसे मिळवायचे याचा मूलमंत्र एनआयटी नागालँडचे माजी विद्यार्थी इंजिनिअर देवेश कुमार शर्मा यांनी विद्यार्थ्यांना दिला ते ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या विशेष करियर मार्गदर्शन शिबिराप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. याप्रसंगी इंजी. दिपंकर रोडे, उपप्राचार्य डी.जी.निकाळजे यांची उपस्थिती होती.

इंजिनिअर देवेश कुमार शर्मा यांनी आपल्या मार्गदर्शनात त्यांना ॲमेझॉन मध्ये त्यांना नोकरी कशी लागली आणि ४५ लाखांचे मोठे पॅकेज कसे मिळवले याविषयी सखोल माहिती सांगितली. ते सद्या कोटक ॲट एट इलेव्हन मध्ये सॉफ्टवेअर डेव्हलपर म्हणून कार्यरत आहेत. पुढे बोलताना इंजी.शर्मा म्हणाले की, यामध्ये सर्वात जास्त महत्त्वाचा मुद्दा विद्यार्थ्यांचा सी.व्ही (बायोडाटा) आहे. विद्यार्थ्यांनी आपला सी.व्ही (बायोडाटा) तयार करताना तो सर्वात चांगला कसा असेल याकडे लक्ष दिले पाहिजे असे त्यांनी आवर्जून सांगितले. इंटरव्यू प्रोसेस कशी असते आणि त्यामध्ये किती राऊंड असतात याबद्दलही त्यांनी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. इंजी.शर्मा यांनी मशीन लर्निंग , एआय डेटा सायन्स तसेच विविध वेबसाईट बद्दल माहिती सांगत जॉब साठी कुठे अप्लाय करायचा याबद्दल विद्यार्थ्यांना

सखोल मार्गदर्शन केले. तसेच इंटरव्यू मध्ये विचारले जाणारे विविध प्रशन याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या करियर मार्गदर्शन शिबिराच्या शेवटी प्रश्न उत्तराच्या माध्यमातून इंजी. देवेश कुमार शर्मा यांनी विद्यार्थ्यांच्या विविध शंका दूर केल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.किशोर वाघमारे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.समीर मिर्झा यांनी मानले. यावेळी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी विद्यार्थिनी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

परळीत श्री रामलिंग चौंडेश्वरी देवी उत्सवाची थाटात सांगता

परळी (प्रतिनिधी):– होमहवण, ग्रंथदिंडी, काल्याचे किर्तन व महाप्रसादाने गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या श्री रामलिंग चौंडेश्वरी देवी देवांग पुराण पारायण सोहळा मोठ्या थाटा– माटात पार पडला. कोष्टी समाजाने आयोजित केलेल्या कार्यक्रमांचा परळी व पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घेतला. शिस्तबध्द पध्दतीने निघालेल्या ग्रंथदिंडीकडे परळीकरांचे लक्ष वेधले. लहान मुलांच्या हातातील भगवे पताके, महिला व पुरूष व बालकांनी घातलेले भगवे फेटे , रामलिंग चौंडेश्वरी मातेचा व रामकृष्ण हरी चा जयघोषाने परळीनगरी दणाणली होती. टाळ–मृदंग , बॅन्ड पथक वामुळे सर्वजण मंत्रमुग्ध झाले होते. शहरातील गुरूकृपानगर येथील श्री हनुमान मंदिर येथे दि.२५ जानेवारी रोजी श्री रामलिंग चौंडेश्वरी देवांग पुराण पारायण व मान्यवरांच्या उपस्थीत ग्रंथपुजा करून प्रारंभ करण्यात आला होता. या वेळी मोठ्या प्रमाणावर भाविकांची उपस्थीती लाभत होती. पारायण व्यासपीठ प्रमुख म्हणून सौ. सोनाली हेरगांवकर या होत्या. ॥ या समाहाची सांगता दि. २५ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ६ वा.होमहवन, १० ते १२ ग्रंथदिंडी, दुपारी ११ ते १ बालकीर्तनकार ह.भ. प.कु.गौरी हेरगावकर यांचे काल्याचे किर्तन व त्यानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. किर्तनाचा व महाप्रसादाचा हजारों भाविकांनी लाभ घेतला.॥॥ ॥पालखी व ग्रंथदिंडीचे विविध ठिकाणी स्वागत.... ॥ समाहाच्या समारोपाप्रसंगी काढण्यात आलेल्या श्री रामलिंग चौंडेश्वरी देवीच्या प्रतिमेची पालखी व ग्रंथदिंडीचे विविध ठिकाणी रांगोळीची आरास व पुजा करून भाविकांनी दर्शन घेतले. टाळ–मृदंग, रामलिंग चौंडेश्वरी देवीचा जयघोष, रामकृष्ण हरिचा गजर , महिला, पुरूष, अबाल वृध्दांनी घातलेले फेटे, फटाक्यांची अतिषबाजी, फुगडया, भजन याकडे परळीकरांचे लक्ष वेधले.

मराठा आरक्षण आंदोलनामुळे अनेक गावात शुकशुकाट

गेवराई (प्रतिनिधी); बीड जिल्हा हा उसतोड मजूराचा जिल्हा म्हणून ओळखला या जिल्हातून लाखो ऊसतोड मजूर इतरत्र ऊसतोडणीसाठी जातात.याच प्रमाणे गेवराई तालुक्यातून देखील मोठये प्रमाणावर ऊसतोड कामगार इतर जिल्हात ऊसतोडणीसाठी गेले आहे.शिवाय सध्या मराठा समाज बांधवांचे मराठा आरक्षण टोकाच्या भुमिकेवर आसल्याने दि.२६ उद्या शुक्रवार रोजी प्रजासत्ताक दिनापासून मनोज जरांगे पाटील यांचे मुंबई येथे अमरण उपोषण होत आहे.या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी व मागिल पाच दिवसापासून निघालेल्या मुंबईकडील पदयात्रेत गेवराई तालुक्यातील लाखो मराठा समाज बांधवांच्या महिला पुरुष व अबालवृद्द सहभागी झाल्याने तालुक्यातो अनेक गावे माणसाअभावी ओस पडली असून अनेक घरे ताळेबंद झाली आहे.तालुक्यातून इतर व विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नागरिक बाहेर गेल्याने याचा फटका गेवराई शहरातील व्यापारपेठेला बसला आहे.एवी सकाळपासूनच खुल्या होणा–या व्यापारपेठेत सध्या सकाळी उशिरा खुल्या होत आसल्याने अशा

पेठेत या दरम्यान शुकशुकाट दिसून येऊन रस्ते निर्मनुष्य दिसून येत आहे. ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून बीड जिल्हायाची ओळख इतर जिल्हातील नागरिक हमखास करत आसतात.प्रति वर्षाप्रमाणे यंदा देखील दिवाळी दसरा दरम्यान बीड जिल्हातून लाखो ऊसतोड कामगार बाहेर जिल्हात उसतोडणीसाठी गेले आहे.अनेक कामगार तर सह कुंटूब गेले आहेत.यामधे गेवराई तालुक्यातील विविध गावातील,वाड्या वस्त्या व तांड्यावरुन मोठ्या प्रमाणावर ऊसतोड कामगार ऊसतोडणीसाठी गेले आहेत.त्यातच आणखी एक भर झाली ती म्हणजे मराठा आरक्षणाची,मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मराठयोच्या मनोज जरांगे पाटील हे मुबंई येथे अखेरची आरपारची लढाई म्हणून मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी २६ जानेवारीपासून अमरण उपोषणास बसणार आहेत.तत्पूर्वी त्यांनी पाच दिवसापासून आपल्या गावापासून पदयात्रा मुबंईकडे काढली आहे.या यात्रेत गेवराई तालुक्यातील लाखो मराठा समाजातील महिला,पुरुष,तरुण,तरुणी व अबालवृद्द सहभागी झाले आहेत.त्यामुळे गेवराई तालुक्यातील अनेक गावे ओस पडली असुन अनेक गावातील घरे ताळेबंद झाले आहेत.गेवराई शहरातील व्यापारपेठा ह्या ग्रामीण भागातील नागरिकांच्या विविध वस्तू व देवाण घेवाण व खरेदी विक्रीवर अवलंबून असतात.गेवराईतील व्यापारपेठा दिवाळी दसरा अगोदर सकाळपासूनच खुल्या होत नागरिकांची खरेदी विक्रीला सुरवात होत होती.मात्र सध्या ऊसतोडणीसाठी व मराठा आरक्षण मागणीसाठी मुबंईला मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातील लोक गेल्याने याचा फटका गेवराई शहरातील व्यापारपेठांना बसत्याचे दिसून येत आहे.हब्ध? ग्राहकां अभावी व्यापारपेठत सकाळी उशिरापर्यंत शुकशुकाट दिसून येत आहे.याच सकाळच्या उशिरापर्यंत अनेक व्यापारपेठत सत्वे निर्मनुष्य दिसून येत आहे.परिणामी गेवराई शहरातील व्यापारपेठत आर्थिक मंदी आली असुन दुकानदार देखील ऊसतोड कामगार कधी परतील याची वाट पहात आसल्याचे दिसुन येत आहे.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे निकृष्ट आणि असमाधानकारक

बीड (प्रतिनिधी): जिल्हातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत बहुतांश रस्ते महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था बीडचे अधिकारी कार्यकारी अभियंता (प्रम्ग्रासयो) अ.ज्ञ.सगर यांनी संबंधित कंत्राटदार यांच्याशी संगनमतानेच निकृष्ट दर्जाचे केले असुन रस्ते ग्रामस्थांसाठी कि गुत्तेदार पोसण्यासाठी असा प्रश्न ग्रामस्थांना पडला असुन सामाजिक कार्यकर्ते तथा विविध संघटनांनी रास्ता रोको आदि आंदोलने करून चौकशी करण्याची मागणी केल्यानंतर रस्त्याची वाट लावणा–या कंत्राटदारांची पाठराखण करत करण्यात आलेले रस्ते हे अंदाजपत्रकानुसार, गुणवत्तापूर्ण आणि समाधानकारक झाले असुन तक्रारदार यांच्या तक्रारींमध्ये तथ्य दिसुन येत असल्याचे लेखी कळवण्याचा कोठगेपणा केल्याचे दिसून येत आहे त्यामुळे कार्यकारी अभियंता (प्रम्ग्रासयो) महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था बीड यांना मोतीबिंदु झालाय का? ?असा सवाल डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.ह्बबीड तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था बीड यांच्या मार्फत पालवण चौक ते लिंबागणेश प्राजिमा ३१जवळ ते आहेर पानोरा,वरवटी – ,भाळवणी,बेलेश्वर चौक ते लिंबागणेश एकुण २७ किलोमीटर लांबीच्या अंदाजे किंमत १२ कोटी ७५ लाख रुपये रस्त्याचे काम सुरूवातीपासूनच अत्यंत निकृष्ट दर्जाचे व गौण खनिज चोरी करून ठेकेदार एम.टी.मस्के कन्स्ट्रक्शन बीड आणि महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था बीड अधिकारी यांनी संगनमताने खोटे अहवाल जोडत शासनाची दिशाभूल केली आहे.संबंधित प्रकरणात वारंवार तक्रार निवेदनानंतर थातुरमातुर दुरुस्ती म्हणजेच ठिगळं लावण्याचे काम करण्यात येते.॥

सातत्य पूर्ण काम केल्यास यश निश्चित प्राप्त होते.–दिपक घुमरे

टोटेवा (प्रतिनिधी):– सध्या स्पर्धेचे युग आहे स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या स्पर्धेत भाग घेवून सराव केला पाहिजे. त्यामुळे शिक्षणाबरोबरच बौध्दिक विकास होतो. तर द.बा.घुमरे पब्लिक स्कूलमध्ये वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षा घेवून गुणवत्तापुर्ण शिक्षण दिले जाते विध्यार्थांनी सातत्य पूर्ण अभ्यास करावा कोणतेही काम सातत्य पूर्ण केल्यास यश निश्चित प्राप्त होते असे प्रतिपादन दिपक घुमरे यांनी व्यक्त केले. कै.वंचल्याबाई घुमरे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित द.बा.घुमरे पब्लिक स्कूल, गेवराई येथे बुधवार दि.२४ जानेवारी रोजी शिक्षक ,विध्यार्थी पालक मेळावा व बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव दिपक घुमरे तर प्रमुख पाहुणे म्हणून समर्थ शिक्षण संस्थेचे सचिव सुभाषराव पवळ, सा.गौरापूर दर्शनचे संपादक शिवाजीराव ढाकणे, दै.लोकप्रभाचे उपसंपादक काझी अमान, व्हॉईस ऑफ मीडियाचे तालुकाध्यक्ष तथा दैनिक लोकराणाचे तालुका प्रतिनिधी विनोद पौळ, पालक प्रतिनिधी दिलीप सोमवणे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक घुमरे एस.के. माध्यमिकचे मुख्याध्यापक आमरुळे एम.बी.यांच्या सह माता–पालक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.॥ पालक मेळाव्यात शाळेचे मुख्याध्यापक सतिश घुमरे यांनी शाळेचा कार्यअहवाल सादर करुन वार्षीक आढावा पालकांसमोर मांडला. पालक मेळाव्यात पत्रकार शिवाजीमामा ढाकणे, जेष्ठ पत्रकार काझी अमान, दिलीप सोनवणे यांनी मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी पुढे बोलताना दिपक घुमरे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी शाळेत प्रयत्न केले जातात. परंतु विद्यार्थ्यांच्या आधिक गुणवत्तेसाठी पालकांनीही लक्ष दिले पाहिजे. बेसिक पुर्ण झाले पाहिजे. विद्यार्थ्यांनीही विविध स्पर्धा परिक्षेत सहभाग नोंदवला पाहिजे. स्पर्धा

पान ४ वरून...

अमर नाईकवाडे यांना...

पाहता संपूर्ण बीड शहरातील नागरिकांना करोना काळात अत्यावश्यक असणारी सेवा स्वत: संकट प्रसंगी उभे राहून केली आहे याबरोबरच त्यांच्या प्रभागात त्यांनी निर्माण करून दिलेल्या आणि घेतलेल्या नागरी सुविधा बीड शहराच्या विकसीत भर टाकणारे असून बीड शहरात आदर्शवत ठरणारे आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना सन्मानित करण्याचा निर्णय घेतला आहे. या सत्कार सोहळ्यास उपस्थित राहून आपणही सामाजिक कार्यकरणा–या कार्यकर्त्यास प्रोत्साहन द्यावे असे आवाहन सद्भावना मित्र परिवाराचे प्रवक्ते राजेंद्र मुनोत सदस्य अमर डागा पुसाराम लददड प्रा रत्नाकर क्षीरसागर शांतीलाल पटेल सूरज लाहोटी कल्याण कुलकर्णी राम मोटवाणी विश्वनाथ माणुसमारे अभयसेठ कोटेचा आणि स्व राधेश्यामजी मुंदडा यांच्या वतीने करण्यात येत आहे

३० जानेवारी १३....

हा रोग हवेतून पसरत असल्यामुळे रोगप्रसाराची साखळी खंडित व्हावी याकरिता समाजात या रोगाबाबत विविध गैरसमज व रुग्णांबाबत अतिशय घृणा असल्यामुळे दडुन लपुन राहिलेल्या आहेत. त्या नवीन केसेस लवकरात लवकर शोधून काढणे व त्वरित उपचारावर ठेवणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.असे केल्यास कुष्ठरोगाचा संसर्ग झालेल्या व्यक्तीचा आजार वाढत नाही व सदर व्यक्तीचे हातपायाची बोटे, हातपाय, डोळे, नाक इत्यादी अवयव सुरक्षित राहून व्यक्तीला विकृती, कुरुपता, अपंगत्व व हतबलता हातबल येण्यापासून वाचवता येते. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींनी पाहिलेले व अर्धवट राहिलेले एकमेव स्वप्न म्हणजे कुष्ठरोगाचे भारतातुन निर्मूलन होय. त्यामुळे त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कुष्ठरोग जनजागृती पंधरवाडा मोहिमेत सर्वांनी सामील व्हावे व सहकार्य करावे, असे आवाहन सहाय्यक संचालक डॉ. नरेश काशट अरोग्य सेवा (कुष्ठरोग) बीड यांनी केले आहे.

दादा पाटील राजळे कला...

यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी राष्ट्रीय सेवा योजनेची कार्यक्रमाधिकारी प्रा .डॉ .अशोक देसाई तसेच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे प्रमुख प्रा .डॉ .किशोर कुमार गायकवाड ,संगणक विभाग प्रमुख प्रा .चंद्रकांत पानसे , प्रा . आस्लम शेख यांनी परिश्रम घेतले . या कार्यक्रमास लोकनेते आप्पासाहेब राजळे औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी,डॉ .अण्णासाहेब शिंदे कृषी तंत्रनिकेतन विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते .तसेच या कार्यक्रमास डॉ .जी टी कानडे डॉ .जी .बी .लवांडे , डॉ . राजकुमार घुले, डॉ. राजू घोलप उपस्थित होते .

पान १ वरून...

माहिला आणि...

प्रतिपादन अप्पर जिल्हाधिकारी डॉ. वीगूण कुलकर्णी यावेळी म्हणाले. राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त उपस्थित सर्वांना शपथ देण्यात आली. ही शपथ किती जाणीवपुर्वक तयार केली गेली असल्याचे त्यांनी यावेळी विवेचन केले. निवडणूकीचा हक्क बजावताना धर्म, वंश, जात समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करावे असा संदेश प्रतिज्ञाच्या माध्यमातून देण्यात आला. याचे पालन केल्यास लोकशाही अधिक सदृढ होईल, असे श्री. कुलकर्णी म्हणाले.

निवासी उपजिल्हाधिकारी तथा उप निवडणूक अधिकारी शिवकुमार स्वामी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतेवेळी बदलती मतदान नोंदणीची पद्धतीची माहिती दिली. व्होटर हेल्प लॉईन ॲप ( ) चा वापर करून यादीमध्ये नाव कमाविष्ट करू शकता, वगळू शकता, दुरूस्ती करू शकता अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. निवडणूकीच्या कामात बीएलओ, डेटा ऑपरेटर यांनी केलेले काम कौतुकासपद असून यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकारी मुधोळ मुंडे, अप्पर जिल्हाधिकारी डॉ. कुलकर्णी , निवासी उपजिल्हाधिकारी श्री स्वामी यांच्या हस्ते नवमतदार , बीएलओ, डेटा ऑपरेटर यांचा सत्कार करण्यात आला.

शेतकऱ्याने घेतला गळफास ...

आई वडिल व भाऊ आहे.त्यांनी गळफास घेण्यापूर्वी दि.१९ जानेवारी रोजी मराठा आरक्षण करिता आंतरवालीला जाऊन आले होते.घरी टीव्ही वरती मराठा आरक्षणाच्या बातम्या नेहमी पाहत असत तोच विचार त्यांच्या मनात सतत येत होता,आणि त्या विचाराने उद्विग्न होऊन त्यांनी आत्महत्या केली.त्यांचा मुलगा सध्या बारावी मध्ये शिक्षण घेत आहे.आपल्या मुलाने पुढे त्याचे आयुष्य कसे जगाचे या विचारात ते व्यथित होऊन ओक्साबोक्शी रडले आणि आपल्याला आरक्षण नाही, कधी भेटणार या एकच विचारने एक सारखे विचार करत होते.आरक्षण मिळत नसल्याने याच विचारने अखेर त्यांनी गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली आसल्याचे कुंटूबातील व गावातील ग्रामस्थांमधून बोलले जात आहे.त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

शिरूर कासार पंचायत..

या कार्यक्रमास आष्टी पाटोदा शिरूरचे आमदार बाळासाहेब आजबे, रामकृष्ण बांगर, दशरथ वणवे, डॉ.शिवाजी राऊत, सतीश शिंदे, गहिनीनाथ सिरसाट, विश्वास नागरगोजे, दीपक घुमरे, नवनाथ ढाकणे, अक्षय जाधव, सौ. प्रियांका केदार, बाबुराव केदार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, तहसीलदार विपीन पाटील, गटविकास अधिकारी संजय केंद्रे यांसह आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री अविनाश पाठक यांनी केले. तर आ.बाळासाहेब आजबे काका यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

जोगाईवाडी ग्रा.पं...

ग्रामपंचायतच्या वतीने द्वाखे अन्यथा ग्रामस्थ ग्रामपंचायतला कुलूप लावून अक्रत्याग आंदोलन करतील असा इशारा निवेदनात देण्यात आला होता आज ग्रामपंचायतच्या सरपंचाशी ग्रामस्थांनी या विषयावर चर्चा करण्यासाठी गावात बोलावले असता मला येणे होत नाही अशी नकारात्मक भूमिका सरपंचांनी घेताच ग्रामस्थ संतापले ग्रामस्थांनी ग्रामपंचायतला टाळे ठोकून ग्रामपंचायत समोर उपोषणाला बसले त्यानंतर सरपंच पती गावात आले असल्याची माहिती मिळत आहे मात्र ग्रामस्थांची व सरपंच पतीशी काय चर्चा झाली हे मात्र अद्याप होऊ शकले नाही

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malivcs, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malivcs, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड –४३१११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

संक्षिप्त वृत्त

प्रजासत्ताक दिनानिमित्त माजलगावात भव्य रक्तदान शिबिर

माजलगाव (प्रतिनिधी):- यंदा देशात साजरा केल्या जाणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या ७५ व्या हिरक महोत्सवानिमित्त माजलगाव शहरात फुलेनगर यंग ग्रुपच्या माध्यमातून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबिरात भरपूर रक्तदात्यांनी सहभाग घेऊन आपल्या मनुष्यधर्मासह राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावी असे आवाहन आयोजकांकडून करण्यात येत आहे.ङ्कङ्कमाझे शहर माझी जबाबदारी या दृष्टीकोनातून काम करत असलेला येथील फुलेनगरचा यंग ग्रुप काम करत आहे.यंदा २६ जानेवारी रोजी भारत देश प्रजासत्ताक दिनाचे हीरक महोत्सवी वर्ष साजे करीत आहे.यानिमित्त माजलगाव येग ग्रुपच्या व सिटी ब्लड बँक बीडच्या वतीने शहरात भक्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.फुलेनगर येथील एक मिनार चौक येथे सकाळी साडेनऊ ते तीन वाजेपर्यंत या वेळत रक्तदात्यांना रक्तदान करता येणार आहे.या कार्यक्रमाचे उद्घाटक माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पो.नि. शितलकुमार बह्वाळ राहणार आहेत.तरी रक्तदात्यांनी या शिबिरात मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन माणुसकीचे कर्तव्य पूर्ण करावे असे आवाहान आयोजक मुफ्ती शब्बीर व मिलिंद देशमुख यांच्यासह फुलेनगर यंग ग्रुपच्या वतीने केले आहे.

श्रमदानातून परसबागेची तलवाडा उच्च माध्यमिक विद्यालयात उभारणी

तलवाडा (प्रतिनिधी); गेवराई तालुक्यातील श्रमदानातून परसबागेची उभारणी उच्च माध्यमिक विद्यालय तलवाडा या विद्यालयात विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून दि.२४/१/२०२४ रोजी परसबागेची उभारणी करण्यात आली यासाठी प्राचार्य प्रेमोदजी गोरकर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व प्राध्यापक पाठक सर यांनी खुप परिश्रम घेतले व उच्च माध्यमिक विभागाचे प्रमुख प्राध्यापक भोसले सर यांनी विद्यार्थ्यांना परस बागेत वेगवेगळ्या फळभाज्यांची लागवड करण्यासाठी मार्गदर्शन केले यासाठी विशेष सहकार्य म्हणून प्राध्यापक सी बी तौर सर यांनी विद्यार्थ्यांना भाजीपाला लागवड यासाठी विशेष सेंद्रिय खतांची माहिती दिली व प्रा. वाघमारे सर यांनी विद्यार्थ्यांना या कामासाठी प्रोत्साहित केले व प्राध्यापक गिरे सर यांनी ही या कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले विद्यालयाचे प्रवेयक्षक अरूण हटकर सर यांनी विद्यार्थ्यांना परसबागेमध्ये वेगवेगळ्या फळभाज्यांची बियाणे उपलब्ध करून दिले व परसबाग तयार करण्यासाठी वाप्यानी लांबी किती असावी पाणी कशा प्रकारे द्यावे याचे मार्गदर्शन प्राध्यापक पवार सर यांनी केले व विद्यार्थ्यांचाही यामध्ये सक्रिय सहभाग होता त्यामध्ये बारावी कला शाखेचे विद्यार्थी काळे, ऋषिकेश शिंदे, आकाश काळे, शुभम घाटोळ, अनिकेत खटके, वैभव जाधव, राहुल मेहरगळ, रतन घाटूळ ,आनंद शिंदे, राहुल रोकडे ,विशाल चव्हाण ,पवन काळे, सुशील चव्हाण, लाड गोविंद, व या कार्यक्रमासाठी प्रा. विश्वनाथ तौर तर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. व प्रा. पैठणी एन डी हे उपस्थित होते व प्रा. पाटील ए एम यांनी यांनी सर्व कार्यक्रमाची नियोजन केले सुदाम शिंदे सर व गांधले मामा यांचे पण विशेष सहकार्य मिळाले आहेत

आधारवड नाना

प्रिय नाना,

२६ जानेवारी अर्थात प्रजासत्ताक दिन जवळ आला की,आम्हा सर्वांना विशेष आनंद होऊ लागतो. अर्थात हा दिवस आम्हा डाके कुटुंबीयांसाठी दुधशर्करा योग म्हणूनच दरवर्षी लाभलेला असतो. प्रजासत्ताक दिन आणि आपला वाढदिवस असा हा दुग्धशर्करा योग असतो. आणि म्हणूनच हा दिवस गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही मोठ्या आनंदात साजरा करतो. नाना तुम्ही मला केवळ जन्मालाच घातले नाही तर, माझ्या हाडा-मांसाच्या या देहाला आकार देऊन आपण मला शिक्षक, लेखक, श्रीमद्? भागवत कथाकार, कीर्तनकार, कवी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे माणूस म्हणून मला घडवलंत. नाना तुमचं संघर्षमय आयुष्य मी लहानपणापासून आजवर पाहत आलोय. तुमचा सरळपणा तुमच्यातील संयम, सदैव दुसऱ्यासाठी काम करण्याची वृत्ती अर्थात परोपकारी जीवन शैली साधेपणा, आदि मूल्यांसह अनेक जीवन मूल्यां मी तुमच्याकडून वारसाहक्काने घेतलीत.

नाना,संघर्ष जणू काय तुमच्या पाचवीलाच पुजलेला होता. तुमच्या जन्मापासून आजपर्यंत तुम्ही सदैव संघर्षाशी दोन हात करतच जीवनाची वाटचाल करत आलात. आई-वडिलांची प्रचंड गरिबी असल्याने, इच्छा असतानाही तुम्च्या लहानपणी तुम्ही चांगल्या प्रकारे शिक्षण घेऊ शकला नाहीत. घरची प्रचंड गरिबी असल्यामुळे,शेतीत काबाडकष्ट करावे लागले. अंगी असणारे प्रचंड बळ व त्यामुळे शेतातील कठीण अवघड कामे तुम्ही अगदी सहज उल्हासने,हिरीरीने करत होता; ही गोष्ट जुन्या पिढीतील जाणती मंडळी आम्हाला नेहमी सांगतात. अडल्या-नडल्या,दीन-दुबळ्याना मदत करणे, दुसऱ्याच्या कामी येणे या गुणामुळे गावातील कुन्वाही गरजूंना त्यांच्या मदतीला धावून जाऊन त्यांची तुम्ही मदत करायचात. हीच परोपकारी वृत्ती तुम्ही जोपासल्याने तुमच्या माध्यमातून सायकलवर दूध वाहणारा सामान्य दुधवाला बीड सारख्या महत्त्वाच्या बाजार समितीचा सभापती होऊ शकला. हा खडतर प्रवास तुम्ही निष्ठेच्या व प्रामाणिकपणा च्या बळावर यशस्वीपणे पार पडला. कसलाही राजकीय वारसा नसताना,समाजसेवेच्या व्रताने आपण गावाची,पंचक्रो शीची, तालुक्याची सेवा करत राहिलात. ही समाजसेवा करत असताना, बीड जिल्ह्याच्या माजी खासदार स्व. केशरकाकू क्षीरसागर, माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर साहेब, नगराध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर साहेब यांच्या सहवासात,नेतृत्वात आपण समाज कार्यातून राजकारणात प्रवेश केलात. पुढे नेतृत्वाशी असलेल्या निष्ठेमुळे व प्रामाणिकपणामुळे आपण काठोडा ग्रामपंचायतीचे उपसरपंच, बीड पंचायत समितीचे सदस्य,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड तालुकाध्यक्ष बीड बाजार समितीचे सभापती अशा अनेक पदावर काम करून समाजातल्या शेवटच्या घटकाला शासनाच्या विविध विकास कामांचा योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आपण आपल्या पदाचा उपयोग केलात.

नाना, मला चांगले आठवतेय मी लहान असताना आपण मला इंग्रजी महिने शिकवत असताना शेवटच्या डिसेंबर महिन्याचे नाव उच्चारताना डिसेंबर म्हणून मोठ्या प्रेमाने माझा पोटाला हाताने फाईट मारत ''द्विशशीम'' म्हणत शिकवायचात. सायकलच्या कॅरियर वर बसून तुमच्याबरोबर मी पाटेगावला आजोळी गेल्याचे आजही माझ्या चांगलेच स्मरणात आहे. तुमच्या बरोबर हिरो होंडा मोटरसायकल वर तुमच्या कमरेला हाताने गच्च धरून बसल्याचे मला चांगलेच समरणात आहे. माझ्या इतर सर्व भावंडां पेक्षा माझ्यावर काकणभर अधिक प्रेम करून तुम्ही मला ''लाडाचा'' म्हणून नेहमी झुकतं माप दिलंत. लहानपनी तुम्च्याबरोबर मोटारसायकलवर गावोगावी, खेडोपाडी अखंड हरिनाम सप्ताहातील प्रवचन, किर्तनाला जाताना आपल्या चेहऱ्यावरचे हास्य व समाधान मी कैक वेळेला पाहत आलोय. त्यातूनच माझ्यातल्या कीर्तनकाराची भागवतकराची, प्रवचन काराची जडणघडण झाली. तुम्ही पोटतिडकीने भावार्थगामायनाचा अर्थ सांगत असताना मी तुमच्या कडे लक्ष देऊन तुमचा प्रत्येक शब्द ऐकायचो. तुमची पोथीची अर्थ सांगण्याची हातोटी, तन्मयता, स्पष्टपणा परखडपणा मी नकळत टिपला आहे.

माझ्या जन्माच्याही अगोदर पासून तुम्ही ज्ञानेश्वरी व श्री तुकाराम गाथा यांचे नित्य अखंड वाचन करत आलात. ते माझ्या बालमनाने कैक वेळा पाहिले, अनुभवले आहे. म्हणूनच मलाही ज्ञानेश्वरी व गाथा अध्ययनाची सवय लागली. सवयीचे रूपांतर आवडीमध्ये झाले. आणि पाहता पाहता गाथा व ज्ञानेश्वरीचा मी पाईक बनलो. हा तुमचा अध्यात्मिक वसा आणि वारसा माझ्यात कसा व कधी आला हे काल ओघात कळलेच नाही. नाना तुम्ही राजकारण करत असतानाही कधी विरोधक निर्माण केला नाही. निवडणुकीच्या काळापुरते राजकारण;एरवी तुम्ही सदैव व समाजकारण करत आपले- परके हा भाव मनात कधीच ठेवला नाही म्हणूनच तुम्ही इतर पुढार्यांच्या तुलनेत आगळे आणि वेगळे आहात.

नाना तुमच्या जीवनात मोठ्या भावाच्या मृत्यूचे दुःख, तुमच्या मोठ्या बहिणीच्या संसाराचे व शेवटी तिच्या मृत्यूचे दुःख, तुमच्या आई-वडिलांच्या मृत्यूचे दुःख,अशी नाना दुःख आपण पचवलीत. आणि जीवनाची वाटचाल हसत मुखाने केलीत. आम्हा भावंडांना दुःखाचा वाराही लागू नये यासाठी तुम्ही अहो रात्र परिश्रम केलंत.

आज समाजात माझी शिक्षक, कीर्तनकार, कथाकार, साहित्यिक म्हणून जी ओळख आहे. ती केवळ आणि केवळ नाना तुमच्यामुळेच. माझया अनेक ओळखीमध्ये ''डाके नानांचा मुलगा'' ही माझी सर्वश्रेष्ठ ओळख आहे. सूर्या बद्दल काजव्याने काय लिहावे.परंतु वाढदिवसाच्या औचित्य असल्याने, लिहिण्याचा हा माझा छोटासा प्रयत्न आहे.

आम्हा भावंडांवर, परिवारावर गावावर,पंचक्रोशीवर, तालुक्यावर जीवापाड प्रेम करणारे माझे वडील बीड बाजार समितीचे माजी सभापती अरुण नाना डाके साहेब यांना वाढदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा!!!

तुमचा लाडका
माधव अरुणराव डाके, बीड
-९७३०११५६२०

गेवराईत द.बा.घुमरे पब्लिक स्कूलमध्ये पालक मेळावा संपन्न

गेवराई, (प्रतिनिधी);- सध्या स्पर्धेचे युग आहे स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या स्पर्धेत भाग घेवून परिक्षेचा सराव केला पाहिजे.त्यामुळे शिक्षणाबरोबरच बौध्दिक विकास होतो.तर द.बा.घुमरे पब्लिक स्कूलमध्ये वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षा घेवून गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते असे प्रतिपादन दिपक घुमरे यांनी व्यक्त केले. ङ्क के.वंचळाबाई घुमरे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित द.बा.घुमरे पब्लिक स्कूल गेवराई येथे बुधवार दि.२४ जानेवारी रोजी माता-पालक मेळावा संन्न झाला.मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.वार्षोळी व्यासपीठावर मेळाव्याचा अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव दिपक घुमरे तर प्रमुख पाहुणे म्हणून समर्थ शिक्षण संस्थेचे सचिव सुभाष पवळ,पत्रकार शिवाजीराव ढाकणे,काझी अमान,विनोद पौळ, पालक प्रतिनिधी दिलीप सोनवणे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक घुमरे एस.के.माध्यमिकचे मुख्याध्यापक आमब्ले एम.बी.यांच्या सह माता-पालक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.पालक मेळाव्यात शाळेचे मुख्याध्यापक सतिश घुमरे यांनी शाळेचा कार्य अहवाल सादर करन वार्षीक आढावा पालकांसमोर मांडला.तर यावेळी ढाकणे,काझी व दिलीप सोनवणे यांनी आपले मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले.

आशावर्करचा मुलगा झाला पोलीस उपनिरीक्षक

हनुमान फरताडेंची भंडारा येथे पोलीस उपनिरीक्षकपदी नियुक्ती

तलवाडा (प्रतिनिधी);- गेवराई तालुक्यातील भेंड खुर्द येथील शेतकरी कुटुंबातील हनुमान दगडू फरताडे यांची महाराष्ट्र पोलीस अर्केडमी येथील प्रशिक्षण पूर्ण होऊन भंडारा जिल्ह्यात पोलीस उपनिरीक्षकपदी नियुक्ती झाली आहे. याबद्दल त्यांचे सर्वच स्तरातून अभिनंदन केले जात आहे. पोलीस उपनिरीक्षक हनुमान दगडू फरताडे यांचा शेतकरी व सामान्य कुटुंबात जन्म, परिस्थिती अतिशय नाजूक, त्यात वडिलांचे झालेले दुःखद निधन, आई आशा वर्कर म्हणून काम करतात तर मोठा भाऊ शेती व्यवसाय. परंतु गरिबीचा कुठलाही बाऊ न करता जिद्द चिकाटी व मेहनतीच्या बळावर स्वहिमतीने दिवस-रात्र मेहनत करून २०१६ मध्ये पोलीस दलात दाखल झाले. २०१६ ते २०२२ मध्ये नागपूर येथे सहा वर्षे पोलीस दलात नोकरी केली, नोकरी करत करत शिक्षण चालू ठेवले, २०१६ ते २०१८ मध्ये मुक्त विद्यापीठातून पदवी प्राप्त केली. हनुमान फरताडे हे फक्त पदवी घेऊन थांबले नाहीत तर त्या काळात एमपीएससीचा अभ्यास चालू ठेवला. २०१८ मध्ये भेंड खुर्द चे सुपुत्र व भूमिपुत्र प्रशांत वसंत मिटकरी हे महिला व बालविकास अधिकारी तर वसुदेव रामदास पवार हे पीएसआय झाले तेव्हा गावाने त्यांची जंगी मिरवणूक व भव्य दिव्य सत्काराचा कार्यक्रम ठेवला होता. तो कार्यक्रम पाहून पोलीस असलेले हनुमान फरताडे भारावून गेले होते. त्यांनी त्या दिवशी स्टेजवर येऊन शपथ घेतली की, मी सुद्धा पोलीस निरीक्षक होणार आणि तुम्हाला माझे सुध्दा असेच जंगी स्वागत करावे लागणार. जिद्दच त्यांना झोप येऊ देत नव्हती. रात्रीचा दिवस अन दिवसाची रात्र करून त्यांनी प्रचंड अभ्यास केला अन २०१९ मध्येच ते एमपीएससी मार्फत घेण्यात येणाऱ्या ची मुख्य परीक्षा पास झाले, मात्र मराठा आरक्षणामुळे तो निकाल रद्द झाला. हाती तोंडी आलेला घासही आरक्षण नसल्याने हिरावून घेतला होता. तरीही पुन्हा न खचता न डगमगता पुन्हा अभ्यास चालू ठेवला. अभ्यास, अभ्यास आणि अभ्यास एकच ध्येय डोळ्यासमोर ठेवले .नोकरी चालू .यात त्यांचे लग्नही झाले होते. पण पीएसआय चे स्वप्न डोळ्यासमोरून जात नव्हते आणि नावाप्रमाणेच हनुमानाने उड्डाण घेऊन २०२०-२१ मध्ये पुन्हा एमपीएससी परीक्षा पास झाले आणि हनुमान फरताडे पीएसआय झाले. शपथ घेतलेले वचन पूर्ण करूनच ते नागपूर वरून गावात आले. त्यांची जंगी वाजत गाजत गावातून मिरवणूक काढली .प्रत्येक घरातील माय-माऊली त्यांना ओवाळत होती व डोक्यावरून व गालावरून हात फिरवत आशीर्वाद देत होती. संपूर्ण गाव आनंद उत्सव साजरा करत होता. संध्याकाळी त्यांचा भव्य दिव्य असा सत्कार केला तर आठ महिन्याचा प्रशिक्षण कालावधी पूर्ण करून त्यांची भंडारा ग्रामीण येथे पोलीस उपनिरीक्षक पदी नियुक्ती झाली. एकेकाळी गावात पोलीस आला तर पोरं पळून जायची मागसं लपून बसायची मात्र गावच्या दगडू फरताडे चा मुलगा पीएसआय फौजदार झाला म्हणून लहानापासून मोठ्यापर्यंत माणसं त्यांच्याजवळ येत होती. कोणी सेल्फी,कोणी ग्रुप फोटो काढत होते. सेल्फी घेण्याचा व फोटो काढण्याचा मोह कोणालाच आवरत नव्हता. सगळ्या गावाने हनुमान फरतडे यांचे स्वागत करुन आनंदोत्सव साजरा केला.

दीपा जेधे यांचा जिल्हा परिषद शाळा येथे सत्कार

पाटोदा (प्रतिनिधी) :- नुकत्याच जाहीर झालेल्या एम पी एस सी परीक्षेच्या निकाल लागला असून या निकालात जेधेवाडी तालुका शिरूर येथील रहिवासी असलेल्या दीपा चांगदेव जेधे या विद्यार्थिनीने घवघवीत यश मिळून उपजिल्हाधिकारी पदी निवड झालेने दीपा जेधे यांचा जिल्हा परिषद शाळा कोतन येथे सत्कार करण्यात आले ङ्क दिनांक २४ जानेवारी २०२४ रोजी तालुक्यातील कोतन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे नुकत्याच जाहीर झालेल्या एम पी एस सी परीक्षेच्या निकाल लागला असून या निकालात जेधेवाडी तालुका शिरूर येथील रहिवासी असलेल्या दीपा चांगदेव जेधे या विद्यार्थिनीने घवघवीत असे यश मिळवलेले आहे. तिच्या गुणांनुक मानुसार तिची उपजिल्हाधिकारी पदी निवड झालेली आहे. त्यामुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व सर्व ग्रामस्थ कोतन यांच्या संयुक्त विद्यमानाने तिच्या सत्काराची आयोजन करण्यात आले होते. या सत्काराच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कोतन गावचे सरपंच श्री महेश खेंगरे हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच शिवाजीराव घोशिर, सोसायटीचे चेअरमन राजेंद्र वंजारी, युवा नेते संजय शेठ घोशिर, ग्रामपंचायत सदस्य गोविंद घोशिर, दादाराव घोशिर व ग्रामस्थ ह.भ.प सुखरुप बापू पुरी ,श्री बबनराव राजगुरू, श्री गोकुळ घोशिर, श्री बंडू घोशिर, श्री निवृत्ती घोशिर,श्री शहादेव नागवडकर हे सर्व मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम दीपाताई व त्यांच्या आई वडिलांचा सर्व शिक्षक बंधू भगिनी व सर्व उपस्थित ग्रामस्थ यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. नंतर दीपाताईंनी आपल्या मनोगत मध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मी तुमच्यासारख्याच एका वाडीतील शाळेत माझे प्राथमिक शिक्षण घेतले असल्याचे सांगितले तसेच माध्यमिक शिक्षण ही जाटनांदूर टिकाणी घेतल्याचे सांगितले. माझी आई वडील शेतकरी असल्यामुळे त्यांनी मला माझ्या शिक्षणासाठी लागणाऱ्या खर्चासाठी स्वतः कष्ट करून मोलमजुरी करून मला पैसे देऊन माझे शिक्षण पूर्ण केले. मी एक तुमच्यासारखीच शेतकऱ्याच्या कुटुंबातील मुलगी आहे. मी खूप मेहनत करून हे यश मिळवलेले आहे. तुम्ही सुद्धा कष्ट करण्याची तयारी ठेवल्यास या पदापर्यंत नक्कीच पोहोचू शकता असे विद्यार्थ्यांना सांगितले. एवढेच नाही तर तुम्ही यूपीएससी मधून आय ए एस,आय पी एस होऊ शकता त्यासाठी तुम्ही अभ्यासावर लक्ष केंद्रित करून त्यामध्ये सातत्य टिकवा नक्कीच तुम्ही तिथपर्यंत पोहोचू शकाल. त्याचबरोबर मुलींसाठी सांगितले की तुम्ही शिक्षण घ्या नोकरीला लागा मगच लग्न करा असेही सांगितले. शाळेतील विद्यार्थ्यांनी त्यांना त्यांच्या यशाबद्दल प्रश्न विचारून त्यांच्याकडून यशाचा मंत्र ही घेतला .कार्यक्रमासाठीशाळेतील सर्व विद्यार्थी अमळनेर केंद्राचे केंद्रप्रमुख श्री उकांडे सर शाळेचे मुख्याध्यापक श्री सोनवणे सर सहशिक्षक श्री वारे बाबासाहेब,

श्री मिसाळ बाळासाहेब ,श्री काळे राजू ,श्री जवभावे संतोष, श्री खेडकर योगेश, श्रीमती काळे जयश्री श्रीमती हडदगुने सीमा हे सर्वजण उपस्थित होते शेवटी सर्व मान्यवरांचे श्री योगेश खेडकर सरांनी आभार मानले.

जाहीर प्रगटन

तहसिलदार , बीड यांचे न्यायालयात

जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.२९/२०२३

युवराज पि.वळीराम गायके विरूद्ध **ग्रा.प.कार्यालय सींदाना** ता.जि.बीड पहा

१)युवराज पि.वळीराम गायके रा.सींदाना ता.जि.बीड उपरोक्त प्रमाणे जन्म/मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन मयत **कवाबाई भ.विट्ठल गायके** यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुशंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सरहू अर्जदार यास मृत्यू यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय न.प.कार्यालयास सींदाना ता.बीड येथील जन्म-मृत्यू रजिस्ट्रला घेवुन मृत्यू-प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुराव घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यू नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे सींदाना ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यू रजिस्ट्रला घेवुन मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशीत केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२४/१/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख १.०३.२०२४ ही अे.

तहसिलदार,बीड

जाहीर प्रगटन

ॲड.वाळुंजकर एस.जे.
मा.श्री.ओ.एन.मंत्री साहेब २ रे दिवाणी न्यायाधीश क.स्तर बीड यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १४५/२०२४
वाजीराव रविंद्र भोसले व इतर वि.निरंक

अर्जदार
१)वाजीराव पि.रविंद्र भोसले रा.पिंपळवाडी ता.जि.बीड
२)धनंजय पि.रविंद्र भोसले, रा.वरील प्रमाणे
३)सुमन भ.रविंद्र भोसले, रा.वरील प्रमाणे
विरूद्ध **निरंक**

मागणी - **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट,१८२७ कलम २ नुसार वारस प्रमणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत रविंद्र आश्रुवा भोसले** यांचा मृत्यू झाला. यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत रविंद्र आश्रुवा भोसले यांचा मृत्यू दि.२५/११/२०१७ रोजी झाला आहे. यांचे मृत्यू वरील अर्जदार व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत रविंद्र आश्रुवा भोसले यांच्या मृत्यूंतर वरील अर्जदारांना शासनकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुराव घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत रविंद्र आश्रुवा भोसले यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २८/०२/२०२४ आहे.

आज दि.२३ जानेवारी २०२१ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

अधिक्षक
दिवाणी न्यायालय,व स्तर,बीड

जाहीर प्रगटन

मा.श्री.व्ही.सी.जोशी १ ले दिवाणी न्यायाधीश क.स्तर बीड
ता.जि.बीड यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज नंबर २२८७/२०२३
ॲड.जी.पी.शिंदे यांच्या मार्फत

शहादेव रामहारी हाजगुडे वि.निरंक

ज्यापेक्षा रामहारी सोपान हाजगुडे हे दिनांक ०२.०७.२०२३ रोजी तांदळवाडी घाट, ता.जि.बीड येथे मयत झालेले आहेत आणि तसेच अर्जदार

१) कमलाबाई भ.रामहारी हाजगुडे वय ७३ वर्षे, धंदा-घरकाम, रा.तांदळवाडी घाट, ता.जि.बीड
२) शहादेव पि.रामहारी हाजगुडे, वय ४५ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर
३) शिवाजी पि.रामहारी हाजगुडे, वय ४३ वर्षे, धंदा-शेती रा.सदर
४) वैशाली भ.अमोल सावंत, वय ४१ वर्षे, धंदा-घरकाम, रा.संत नामदेव नगर, धानोरा रोड बीड ता.जि..बीड

अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र.२ व ३ हे मयताचे मुले आहेत तर अर्जदार क्र.४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. या अर्जदारा व्यतिरीक्त मयतास इतर दुसरे कोणतीही वारस नाहीत. असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी ह्या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुराव घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना/अर्जदारांना सदरहु मयत

रामहारी सोपान हाजगुडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २५/०१/२०२४ आहे.

आज दि.२२ डिसेंबर २०२३ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय क.स्तर,बीड

अधिक्षक
दिवाणी न्यायालय,व स्तर,बीड

जिल्हा विशेष
दैनिक
संभाजीनगर, बीड,जालना, परभणी,लातूर, धाराशिव
जनसामान्यांचे शस्त्र
मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे
शुक्रवार, दि. २६ जानेवारी २०२४ पान 4

अंक वाटपासाठी मुले पाहिजेत

दैनिक मराठवडा पत्रचे अंक वाटपासाठी मुले पाहिजेत. गरजुंनी प्रत्यक्ष भेटावे.
-------:: पत्ता ::-------
दैनिक मराठवाडा पत्र कार्यालय ,सहयोगनगर जालना रोड, बीड.
मो.: 9822152955

वार्डात पसरले घाणीचे साम्राज्य सत्ताधारी महिला सदस्य आक्रमक

जनतेने कौल देवून विकासाच्या मुद्द्यावर ग्रामपंचायत निवडणुकीत भरघोस मतदान करून निवडून दिल्याने त्यांच्या समस्या,अडचणी दूर करण्याची जबाबदारी सत्ताधारी सदस्या यांच्यावर असते परंतु ग्रामसेवक आणि सरपंच कोणत्याच कामाला प्रतिसाद देत नसून विकासाच्या नावाखाली बोगसगिरी करत असून,थातुर मातुर काम करण्यात धन्यता मानत असल्याने सत्ताधरी महिला ग्रामपंचायत सदस्य संमिंदरबाई काळे या चांगल्याच आक्रमक झाल्या असून वॉर्डातील नाली चे बांधकाम नकेल्यास नालीत बसून आंदोलन करण्याचा इशारा गटविकास अधिकारी गेवराई यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

दिलेल्या निवेदनात पुढे म्हंटले आहे की,माळी गल्ही,मुस्लिम मोहल्ला या वॉर्डातील नाल्याचे काम झाले नसल्याने नालीचे घाण पाणी रस्त्यावर येत आहे त्याच बरोबर नागरिकांच्या घरात ही घुसत असल्याने जनतेच्या आरोग्याचा जवलंत प्रश्न उपस्थित होत आहे,याबाबत मागील तीन वर्षांपासून ग्रामपंचायत च्या मासिक सभा आणि ग्रामसभेत हे प्रश्न मांडण्यात आले असून सरपंच सरपंच आणि ग्रामविकास अधिकारी यांना वारंवार सांगण्यात येऊनही त्यांनी याकडे कानाडोळा केल्याने वॉर्डातील नागरिकांना अनेक समस्या,अडचणी यांचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.जर सदरील काम लवकरात लवकर करण्यात आले नाही तर नालित बसून आंदोलन करण्यात येईल असा इशारा महिला ग्रामपंचायत सदस्य संमिंदरबाई प्रभु काळे यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदन देवून दिला आहे.

नालित बसून आंदोलन करणार – संमिंदरबाई काळे

सामान्य जनतेच्या समस्या कायम ..

गाव पातळीवर सामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी मिनी संसद म्हणून ग्रामपंचायत कडे पाहिले जाते परंतु तलवाडा येथे सत्ता बदल झाल्यापासून अनेक समस्या आणि अडचणींना समोरे जावे लागत आहे,वेळेवर कोणतेच काम होत नसल्याने मतदार राजा नाराज आहे.याकडे वरिष्ठांनी लक्ष देवून कारभार सुरळीत करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

भैय्यासाहेब पंडित यांच्याकडे तक्रार करणार..

तलवाडा ग्रामपंचायत ही राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी कडे असून आम्ही सत्तेत असणारे सदस्य आहोत तरीही आमच्या शब्दाला किंमत नसून आमचे काम होत नाही ही शोकांतिका असून याबाबत आमचे नेते भैय्यासाहेब पंडित यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे सांगून भ्रमणध्वनी द्वारे भैय्यासाहेब यांच्या कडे तक्रार केली आहे.

आष्टी- परमेश्वर शिदे या शेतकऱ्यांनी नगर जिल्हात जाऊन दररोज सकाळी ताजे मशीचे दुध मराठा आदोलाकाला मोफत वाटप करत आहेत पुणे जिल्हा संपेपर्यंत मि दररोज सकाळी दुध वाटप करत असताना.

३० जानेवारी १३ फेब्रुवारी बीड जिल्हयात कुष्ठरोग निवारण पंधरवाडयाचे आयोजन

बीड (प्रतिनिधी): संपूर्ण राज्यांमध्ये दिनांक ३० जानेवारी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी (हुतात्मा दिन) हा दिवस कुष्ठरोग निवारण दिन म्हणून साजरा करण्यात वेतो. दिनांक ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी हा कुष्ठरोग जागृती पंधरवाडा म्हणून साजरा करण्यात वेतो. या निमित्ताने जिल्हात विविध कार्यक्रम राबविण्यात वेत आहेत. याकरिता जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा समन्वय समिती स्थापन करण्यात आली असून सदर समितीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा शल्य चिकित्सक,सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग), जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा अशा समन्वय इत्यादींचा समावेश करण्यात आलेला आहे.

दिनांक २६ जानेवारी २०२४ रोजी जिल्हात आयोजित होत असलेल्या ग्रामसभांमध्ये 'स्पर्श अभियान 'अंतर्गत कुष्ठरोग बाबत समाजामध्ये जनजागृती होण्यासाठी कुष्ठरोग विषयक माहिती देणे, जिल्हाधिकारी यांचे आवाहन वाचून दाखवणे व सर्व उपस्थित नागरिकांकडून कुष्ठरोगाची प्रतिज्ञा घेण्याचे ठरलेले आहे. त्यानुसार जिल्हात आयोजित सर्व ग्रामसभांमध्ये कुष्ठरोगाबाबत कार्यक्रम घेण्यात वेणार आहे. 'घोषवाक्य कलंक कुष्ठरोगाचा सन्मान आणि स्वीकार करूनं' घाटनांदूर तालुका अंबाजोगाई येथे दिनांक ३० जानेवारी २०२४ 'कुष्ठरोग निवारण दिन' या दिवशी रॅली काढून कुष्ठरोग विषयक म्हणी लिहिलेल्या फलकाद्वारे जनजागृती करण्यात वेणार आहे.

दिनांक ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२४या पधंरवाडयात नागरिकांमध्ये कुष्ठरोगांबाबत जनजागृती व्हावी याकरिता विविध बाबी करण्याचे नियोजन करण्यात आले. कुष्ठरोगाबाबत गर्दी असलेल्या जसे बस स्टँड, जत्रा, मंदिर इत्यादी ठिकाणी हस्त-पत्रिका वाटणे, शाळांमधून प्रश्नमंजुषा घेणे, इच्चुक असलेल्या शाळांना कुष्ठरोगांबाबत पथनाट्यकरिता स्क्रिप्ट उपलब्ध करून देणे व पथनाट्य घेणे इत्यादी बाबीचे नियोजन करून नागरिकांमध्ये कुष्ठरोग बाबत जनजागृती करण्याचे निश्चित केलेले आहे. बीड जिल्हात कुष्ठरोगाचे प्रसारण दर १०,००० लोकसंख्येत ०.८० एवढे असून सध्या जिल्हात डिसेंबर २०२४ अखेर २२० कुष्ठरुण औषधोउपचारावर आहेत. बीड जिल्हात नवीन कुष्ठरोग निघण्याचे (शोधण्याचे) प्रमाण ९.४ असून या वर्षात माहे डिसेंबर-२०२४ अखेर पर्यंत २२० नवीन कु ष्ठरुण शोधण्यात आलेले आहेत.कुष्ठरोग हा एक संसर्गजन्य आजार असून हा उपचार घेत नसलेल्या संसर्गिक कुष्ठरुणांकडून तो खोकल्यावर, शिंकल्यावर कृष्ठजंतु हवेत पसरतात व श्वासोच्छ्वासाव्दारे निरोगी व्यक्तीच्या शरीरात प्रवेश करतात अशा व्यक्तीची रोगप्रतिकार शक्ती अत्यंत कमी झाल्यावर या आजाराचे लक्षण व्यक्तीच्या शरीरावर दिसू लागतात.

▸▸ पान २ वर

बीड- मराठा आरक्षणासाठी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबईकडे निघालेल्या मोर्च्यातील समाजबांधवांना आरोग्य विषयी कुठलाही त्रास होऊ नये म्हणून त्यांना आरोग्य किट वाटप करतांना लक्ष्मण नरनाळे, नितीन भैय्या धांडे,जयदत्त थोटे,संजय गोडसे,संजय वाघुले आदी.

पिंपळनेर ठाण्याचे ए.पी.आय. कैलास भारती यांची बदली

शासकीय नोकरीमधील अपरिहार्य बाब म्हणजे बदली

बीड (प्रतिनिधी):- निरोप समारंभ दिवासी कैलास भारती यांनी मत व्यक्त करतांना महाणातले की ,बीड जिल्हात मागील सुमारे साडेचारवर्षे काम करता कधी 'बीडकर' होऊन गेलो समजलेच नाही. बीड येथून जालना जिल्हात बदली झाल्यानंतर काल पिंपळनेर पोलीस ठाणे हद्दीतील नागरीक आणि माझे सहकारी यांनी. प्रेमाने निरोप दिला. पोलीस ठाणे आणि बीड जिल्हा सोडताना गहिवरून आले. बीड मध्ये काम करताना माझे वरिष्ठ अधिकारी , सहकारी कर्मचारी, सर्वच क्षेत्रातील बीड मधील नागरिक यांचे मन:पूर्वक धन्यवाद .

दिव्यांग लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

मराठवाडा पत्र न्यूज । बीड

आर्थिक वर्षातील जिल्हा परिषद सौर उत्पन्नातून दिव्यांग कल्याणार्थ राखीव ५० टक्के निधी मधून दिव्यांग व्यक्तीला स्वावलंबी बनविण्यासाठी व स्वत:चा रोजगार उपलब्ध होण्यासाठी झेरॉक्स मशीनचा पुरवठा करणे ही योजना करण्याचे आहे. मुकबधीर व अस्थिव्यंग प्रवर्गातील ५० टक्के व त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग बंधू भगिनींसाठी ही योजना राबविण्यात वेणार आहे.

सदर योजनेसाठी खालीलप्रमाणे कागदपत्रांची आवश्यकता आहे. आधार कार्ड, मतदान कार्ड, अस्थिव्यंग व मुकबधीर दिव्यांगाचे प्रमाणपत्र (८० टक्के पेक्षा जास्त) रहिवासी पुरावा (ग्रामसेवक यांचे), बँक पासबुक (राष्ट्रीयकृत बँकेचे), शौचालय वापरात असले बाबत स्वयंघोषित प्रमाणपत्र, लहान कुटुंबाचे स्वयघोषित प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र (तहसीलदार यांचे ९०००० मर्यादेत), बेरोजगार असल्याचे प्रमाणपत्र (ग्रामसेवक यांचे) व्यवसायाचे

नाहरकत प्रमाणपत्र (ग्रामसेवक यांचे).

सदर योजना ही १०० टक्के अनुदान तत्त्वावर असून गटविकास अधिकारी पंचायत समिती संबंधित यांच्या कार्यालयात दिनांक १ फेब्रुवारी २०२४ ते १० फेब्रुवारी २०२४ कालावधीपर्यंत केवळ ग्रामीण भागातील अर्ज स्वीकारले जातील.

तरी सदर योजनाचा लाभ गरजू दिव्यांग लाभार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन अतिरिक्त मुख्य कार्यकारी,अधिकारी वासुदेव सोळंके व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, आर एम शिंदे यांनी केले आहे.

बारा बलुतेदार संघटनेच्यावतीने चौंडेश्वरी देवी शोभायात्रेचे स्वागत

बीड (प्रतिनिधी):- शाकंबरी पौंष पौर्णिमा नवरात्र उत्सवा निमित्त शहरातील हिरालाल चौक ते क्रांतीनगर येथील चौंडेश्वरी देवी मंदिरा पर्यंत चौंडेश्वरी देवीची शोभायात्रा काढण्यात आली होती. या शोभायात्रेचे बारा बलुतेदार संघटनेच्यावतीने भव्य स्वागत करण्यात आले.

शाकंबरी पौंष पौर्णिमा नवरात्र उत्सवा निमित्त शोभायात्रा काढण्यात आली होती. या प्रसंगी बारा बलुतेदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश कानगावकर, कोष्टी समाजाचे जिल्हाध्यक्ष रविंद्र म्हेत्रे, सुरेश असलेकर, पंधारे, साळी समाजाचे जिल्हाध्यक्ष राजु ताटे, परिट समाजाचे गणेश जगताप, दत्तादेवा नलावडे, रमेश घोडके, कैकाडी समाजाचे जिल्हाध्यक्ष रमेश कैवाडे, लोहार समाजाचे जिल्हाध्यक्ष अशोक आणेराव, मुस्लिम ओबीसी परिषदेचे रफिक बागवान, भुई समाजाचे जिल्हाध्यक्ष संजय घेणे, धनगर कर्मचारी महासंघाचे अंकुश निर्मळ, मल्हार सेनेचे अमर ढोणे, साळी समाजाचे जिल्हाध्यक्ष राजु ताटे, अंड.सुधीर जाधव, एसबीसी संघटनेचे दादू म्हेत्रे, सुतार समाजाचे बापुराव भालेकर, नाभिक समाजाचे गुलाब चव्हाण, रमेश राऊत, गोसावी परिषदेचे अंड.बन, वाणी सामाजाचे योगेश कानडे, जंगम समाजाचे उमेश स्वामी, कासार समाजाचे रमेश रासणे, दत्ता तळेकर यांनी चौंडिश्वरी देवीच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून शोभायात्रेचे भव्य स्वागत केले.

डॉ.एस.आर.रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक ग्रंथमित्रसाठी अर्ज करणे

बीड (प्रतिनिधी):- महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयाकडून राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा, ग्रंथालयांकडून जनतेला अधिक चांगल्या ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन द्याव्यात, वाचन संस्कृती वृध्दींगत करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार'' तसेच, ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवक यांना भारतीय ग्रंथालय शास्त्राचे रंगनाथन यांच्या नावाने ''डॉ.एस.आर.रंगनाथन उत्कृट व ग्रामीण विभागातील ''अ'' ''ब'' ''क'' ''ड'' वर्गातील उत्कृष्ट शासनमान्य सार्वनिक ग्रंथालयांना अनुक्रमे रुपये १,००,०००/-, रुपये७५,०००/-, रुपये५०,०००/-, रुपये२५,०००/- रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते. राज्यातील एक राज्यस्तरीय उत्कृष्ट कार्यकर्ता व एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय सेवकयांना प्रत्येकी रुपये ५०,०००/- रोख रक्कम आणि प्रमाणपत्र तसेच राज्यातील प्रत्येक महसुल विभागातील प्रत्येकी एक उत्कृष्ट कार्यकर्ता व उत्कृष्ट सेवक यांना प्रत्येकी रुपये२५,०००/- रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते. वर्ष २०२२-२३ च्या पुरस्कारासाठी इच्छुक असणारी ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवक यांनी आपले विहित नमुन्यातील अर्ज दिनांक २२ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२४ पर्यंत तीन प्रति आपल्या जिल्हयातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे सादर करावेत, असे आवाहन अशोक गाडेकर, प्र. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले.

दादा पाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालय राष्ट्रीय मतदार दीन साजरा

पाथर्डी (प्रतिनिधी): राज्यशास्त्र विभाग निवडणूक साक्षरता मंडळ राष्ट्रीय सेवा योजना व करिअर कट्टा यांचे संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात दिनांक २५ जानेवारी २०२४ रोजी राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . आर. टेमकर यांनी केले . भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकास मतदानाचा अधिकार दिलेला आहे . एक व्यक्ती , एक मत , एक मूल्य हे तत्व संविधानाने स्वीकारलेले आहे . माझ्या एकट्याच्या मताने काय होणार असा नकारात्मक विचार करू नये . ही राजकीय उदासिनता झिडकारून मतदान करून प्रत्येक भारतीयांनी आपले राष्ट्रीय कर्तव्य पूर्ण केले पाहिजेत आणि भारतीय लोकशाही अधिक अर्थपूर्ण बनवली पाहिजे . असे मत प्राचार्य डॉ . टेमकर यांनी आपल्या प्रास्ताविकेत मांडले . महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा केंद्रांतर्गत चालवण्यात वेणाऱ्या करिअर कट्टायची समासद असलेली विद्यार्थीनी गायत्री साठे हिने सूत्रसचालन केले . दिपाली आदिनाथ शिरसाठ आणि आईशा पठाण यांनी मतदार प्रतिज्ञापत्रा चे वाचन केले . आभार प्रदर्शन राज्यशास्त्र विभागातील डॉ . विलास बनसोडे यांनी व्यक्त केले . कार्यक्रमाच्या

▸▸ पान २ वर

अमर नाईकवाडे यांना सद्भावना पुरस्कार

प्रसिद्ध उद्योगपती राम भोगले आणि जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांच्या हस्ते होणार वितरण

बीड (प्रतिनिधी):- स्व राधेश्यामजी मुंदडा यांच्या स्मृतीप्रित्यर्थ देण्यात वेणारा दुसरा सद्भावना पुरस्कार कोविड काळात अतुलनीय कामगिरी बजावणाऱ्या माजी नगर सेवक अमर नाना नाईकवाडे यांना सद्भावना मित्र परिवाच्य वतीने जाहीर करण्यात आला असून

येत्या शनिवारी प्रसिद्ध उद्योगपती रामचंद्र भोगले आणि जिल्हाधिकारी सौ दीपा मुधोळ-मुंडे यांच्या हस्ते हॉटेल अनविता मधील दरबार हॉल मध्ये सकाळी १०.३० वाजता देण्यात वेणार असून या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन सद्भावना मित्र परिवाचे अध्यक्ष वाय जनार्धन राव व सचिव विकास जमापूरकर व सद्भावना परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या स्व राधेश्यामजी मुंदडा यांच्या स्मृतिप्रित्यर्थ २०२२-२३ पासून सद्भावना मित्र परिवाराच्या

वतीने सुरू करण्यात आला असून याचे पहिले मानकरी म्हणून जेष्ठ रांगकर्मी कुलदीप धुमाडे यांना सन्मानित करण्यात आले होते. यंदाचा हा सद्भावना पुरस्कार करोना काळात सर्वसामान्य रुग्णांना आणि नागरिकांना मनोभावे सक्रिय मदतीचा हात देण्याऱ्या माजी नगरसेवक अमर नाईकवाडे यांना देण्यात वेणार असून पुरस्काराचे स्वरूप मानपत्र सन्मानचिन्ह आणि शाल श्रीफळ असा असून नाईकवाडे यांचा सपत्नीक करण्यात वेणार आहे. या प्रसंगी प्रसिद्ध उद्योगपती तथा वक्ते श्री राम भोगले आणि जिल्हाधिकारी सौ दीपा मुधोळ-मुंडे हे मार्गदर्शन करणार आहेत. अमर नाईकवाडे हे राजकारणात जरी सक्रिय असले तरी करोना काळात कोणतीही जात धर्म पक्ष प्रभाग न

▸▸ पान २ वर